


# अन्न, वस्त्र, निवारा आणि जमीन

अन्न, वस्त्र, निवारा या मानवी जीवनाकरिता मूलभूत आवश्यक गोष्टी आहेत, हे आपण सर्वजण जाणतो. आज या मूलभूत गरजेच्या गोष्टींचं आपण आपल्या सोयीसाठी, आपल्या प्रतिष्ठेसाठी, सुखदायी आणि आरामदायी म्हणजेच 'कम्फर्ट्स' आणि 'लक्झरीज'मध्ये कसं रूपांतर केलं आहे हे आपण पाहातच आहोत, याचं वेगळं वर्णन करण्याची गरज नाही. माणसाच्या प्रगतीचं हे लक्षण म्हणता येईल. कधीकाळी कंदमुळं वेचून खाणारा, लज्जारक्षणासाठी झाडाची पानं शरीरावर गुंडाळणारा आणि निवाऱ्यासाठी गुहेत राहणारा माणूस आज विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आपल्या आहारात घेत आहे, उंची वस्त्रं परिधान करीत आहे आणि आलिशान बंगल्यांमध्ये रहात आहे. एकवेळचेसुद्धा पोटभार खायला न मिळणारे, फाटक्यातुटक्या कपड्यांना ठिगळं जोडून वापरणारे आणि निवाऱ्यासाठी फुटपाथवर संसार मांडणारे लोकही आहेत, हे खरं आहे! म्हणजे या मूलभूत गरजांच्या बाबतीतही टोकाची विषमता दिसत आहे. यादृष्टीने आज अन्न, वस्त्र, निवारा या बाबींची पुन्हा नव्याने चर्चा करण्याची गरज आहे.

ही चर्चा करताना 'जमीन' या घटकाचा विचार करणं क्रमप्राप्त आहे; कारण आपल्या वर उल्लेखित तीन गरजांचा संबंध जमिनीशी आहे. जमीन अन्नधान्य पिकवते म्हणून तिचा संबंध अन्नाशी आहे. जमीन आपल्या पोटात पाणी साठवते म्हणूनही तिचा संबंध अन्नाशी व पाण्याशी आहे. त्याचबरोबर जमिनीवरच घरं उभी राहतात म्हणून तिचा संबंध निवाऱ्याशीसुद्धा आहे. तसं पाहिलं तर वस्त्राशीही जमिनीचा

निकटचा संबंध आहेच. वस्त्रांना लागणारा कापूस जमिनीतच पिकतो. अशाप्रकारे आपल्या मूळ गरजा जमीन भागवते. म्हणजेच या अर्थाने जमीन ही आपली प्रमुख आवश्यकता आहे, त्यामुळे तिचाही विचार आपण प्रामुख्याने करण्याची गरज आहे.

जेव्हा आपण जमिनीचा विचार करतो, तेव्हा जमिनीला मर्यादा आहेत, हे आपण जाणतो. ती वाढवता येणारी गोष्ट नाही. त्यामुळे जमिनीचा वापर योग्यप्रकारे केला गेला पाहिजे. जमीन ही एक सलग गोष्ट आहे, नैसर्गिक रूपात ती कुठे कुठे खंडित झाली असेल, पण आपण जमिनीचे तुकडे पाडले आहेत, जमिनीची विभागणी केली आहे. राष्ट्रा-राष्ट्रांमध्येसुद्धा वेगवेगळ्या राज्यांमध्ये, जिल्ह्यांमध्ये, तालुक्यांमध्ये आणि गावांमध्ये आपण जमीन विभागली आहे. गावांमध्येसुद्धा जमिनीची विभागणी होऊन प्रत्येकाच्या वाट्याची जमीन वेगळी आहे. दोन भावांमध्ये जेव्हा वाटणी होते, तेव्हा जमिनीचीसुद्धा वाटणी होते. अशाप्रकारे आधीच मर्यादित असलेली जमीन आपण आणखी मर्यादित केली आहे. जमिनीची अशी विभागणी किती मर्यादेपर्यंत झाली पाहिजे याचीसुद्धा काही नियमावली असली पाहिजे, त्यामध्येही काही पद्धत असली पाहिजे. जमिनीचा जास्तीत जास्त उपयोग होण्यासाठी हे आवश्यक आहे.

विकासासाठी जमिनीचा उपयोग झाला पाहिजे. जर एखादा उद्योग विकसित करायचा असेल आणि जर त्यासाठी जमीन आवश्यक असेल तर ती घेतली पाहिजे. रस्ते, रेल्वे, विमानतळं तसंच देशाचा विकास घडवणाऱ्या कामांसाठी जर जमिनीची आवश्यकता असेल तर ती जरूर संपादित केली पाहिजे. मात्र, जमीन खरेदी करताना किंवा संपादित करताना तिचा योग्य मोबदला जमिनीच्या मालकाला दिला गेला पाहिजे. कारण त्या जमिनीवर त्याची व त्याच्या पुढच्या पिढ्यांची उपजीविका अवलंबून असते. जमीन जर त्याच्या हातातून गेली तर तो आणि त्याच्या पुढच्या पिढ्यांचं जीवन कसं असेल? यादृष्टीने जमिनीच्या मालकाला केवळ जमिनीचा मोबदला न देता त्या जमिनीचा जो काही विकास होणार आहे त्यात त्याला व त्याच्या पुढच्या पिढ्यांना सामावून घेतलं पाहिजे, जमिनीच्या विकासापासून होणाऱ्या नफ्यात त्याला भागीदार केलं पाहिजे. जेणेकरून त्याच्या व त्याच्या पुढच्या पिढ्यांचा चरितार्थ चालेल. आपण पाहतो की, लोक आपल्या जमिनी विकतात. लाखो-करोडो रुपयांचे व्यवहार होतात पण जमिनीच्या मालकाला-शेतकऱ्याला मिळालेल्या पैशाला पाय फुटतात. वेगवेगळ्या वाटांनी पैसा कसा खर्च होऊन जातो कळत नाही आणि मग पुढच्या पिढीला मोलमजुरीशिवाय पर्याय उरत नाही. त्यामुळेच शेतजमिनीची खरेदी-

विक्री करताना, शेतजमिनी संपादन करताना वेगळ्या पद्धतीने विचार केला गेला पाहिजे. व्यवस्थित नियोजन करून विस्थापित होणाऱ्या प्रत्येकाचं पुनर्वसन केलं गेलं पाहिजे. त्याला पर्यायी शेतजमीन दिली गेली पाहिजे. हे शक्य नसेल तर त्याच्याकडून संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा ज्या कामासाठी उपयोग केला जाणार आहे, त्यातून मिळणाऱ्या नफ्यात त्याला भागीदार करून घेतलं पाहिजे.

असंही दिसून येतं की विकासकामासाठी जमिनी खरेदी केल्या जातात किंवा संपादित केल्या जातात पण त्या जमिनींचा योग्य पद्धतीने वापर होत नाही. उदा. दुपदरी असलेला रस्ता चार पदरी करताना किती हेक्टर जमीन त्यासाठी जाईल याचा विचार आपण करत नाही. दीर्घकालीन स्वरूपात दळणवळणाच्या या साधनांचा लोकांसाठी किती उपयोग होणार आहे आणि निश्चितपणे काय विकास होणार आहे हे पाहण्याची, त्याचा आढावा घेण्याची गरज आपल्याला वाटत नाही. अशाप्रकारे, संपादित केलेल्या जमिनीचा योग्य व पुरेपूर उपयोग होत नाही. जमीन मोठ्या प्रमाणात वाया जाते. एखाद्या मोठ्या प्रकल्पासाठी हजारो हेक्टर जमीन संपादित केली जाते, पण प्रत्यक्षात तो प्रकल्प उभा राहण्यात प्रचंड कालावधी जातो. कधीकधी तर दशकं उलटून गेली तरी प्रकल्प उभे राहात नाहीत. जमीन मात्र संपादित केलेली असते, ती पडून राहते. तिचा उत्पादक उपयोग होत नाही. ती वाया जाते. जमीन अशी पडीक राहण्याऐवजी ज्या शेतकऱ्याची ती होती त्यानेच ती कसली असती तर त्याची अन्नाची सोय झाली असती, पण हे लक्षात घेतलं जात नाही. जमिनीचा असा दुरुपयोग थांबवला पाहिजे.

खरंतर उपयोगाच्या बाबतीत जमिनीच्या तुकड्या तुकड्याचा विचार झाला पाहिजे. दोन शेतांच्या मध्ये असणाऱ्या बांधावर सुद्धा झाडं लावली पाहिजेत. चारा-गवताचं उत्पादन घेतलं पाहिजे. त्यापासून शेतकऱ्याने चार पैसे मिळवले पाहिजेत. शेतकरी कष्टाने जमीन कसतो, मशागत करतो, पीक काढतो. बाजारात शेतीमाल विकायला जातो. मात्र, बाजारात शेतकऱ्याला प्रतिष्ठा मिळत नाही. शेतीमालांचा भाव कसा पाडून मिळेल याचाच विचार दलाल-व्यापारी मंडळी करतात. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचं मोल मिळत नाही. व्यापारी - दलाल त्याची पिळवणूक करतात, हे थांबवलं पाहिजे. शेतजमिनीचा वापर अतिशय पद्धतशीरपणे झाला पाहिजे. जमिनीची उत्पादनक्षमता पूर्णपणे वापरली गेली पाहिजे. गहू, तांदूळ वगैरे अनेक शेतीउत्पादनांच्या बाबतीत आपल्या देशाचा जागतिक स्तरावर वरचा क्रमांक आहे; पण आपल्याकडील

अन्नधान्याच्या प्रतिएकरी उत्पादनाचा विचार केला, तर आपला क्रमांक खूप खाली घसरतो, इतकी आपली प्रतिएकरी उत्पादनक्षमता कमी आहे. ही उत्पादनक्षमता सुधारल्याशिवाय शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रतिष्ठा, मार्गदर्शन मिळालं पाहिजे.

हे झालं शेतजमिनीचं. इतर जमिनीचा देखील पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे. आपण पूर्वीच्या काळातील राजांचा इतिहास वाचतो. त्यात आपल्याला दिसतं की अनेक राजांनी रस्त्याच्या कडेला झाडं लावली. तळी-विहिरी खोदल्या, धर्मशाळा बांधल्या, ही उपयोगाची कामं होती. रस्त्याच्या कडेच्या झाडांमुळे वाटसरूंना सावली मिळत असे. विहिरी-तळ्यांवर तहान भागवता येत असे तर धर्मशाळेत रात्रीचा मुक्काम करता येत असे. आज राजेलोकांची ही कामं सरकारने केली पाहिजेत; पण आज अशी कामं फारशी होत नाहीत. धर्मदाय संस्था अशा कामांसाठी क्वचितच पुढे येतात. आज आपण डोंगरांची अवस्था पाहिली तर खूप भकास चित्रं दिसतं. झाडा-झुडपांविना डोंगर उघडे-बोडके पडलेले दिसतात. डोंगरावर-टेकड्यांवर वृक्षारोपण हौसेनं केलं जातं, पण त्या झाडांची निगा राखली जात नाही, त्यामुळे त्यांची वाढ खुंटते. या गोष्टींचा संबंध थेट पर्यावरणाशी असतो. झाडं नसतील तर पावसाचं प्रमाण कमी होतं, याचा अनुभव आपण वारंवार घेत असतो. जमिनींचा उपयोग झाला पाहिजे, असं आपण म्हणतो, तेव्हा अशा जमिनीपासूनही उत्पन्न मिळालं पाहिजे, असं वाटतं. उदाहरणार्थ, रस्त्याच्या कडेला झाडं लावली, त्यांची निगराणी केली, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली, पर्यटक निवास उभे केले तर त्यातून रोजगार निर्मिती होईल. दोन हातांना काम मिळेल, बेरोजगारी कमी होईल. आज हजारो-शेकडो एकर जमिनी पडून असल्याचं आपण पाहतो, यात शेतजमिनी आहेत, शहरात मोक्याच्या ठिकाणी आणि इतरत्र मोकळे पडलेले प्लॉट्स आहेत. अशा मोकळ्या पडीक जमिनी उपयोगात आणण्याविषयी कायदा-नियम केले पाहिजेत असं मला वाटतं. जमिनी मोकळ्या का पडाव्यात? काही जमिनी मोकळ्या पडण्यामागे काही कायदेशीर वाद असतील, प्रकरणं न्यायप्रविष्ट असतील. पण ज्या जमिनी या पासूनही मोकळ्या आहेत, आणि जिथे काही काम करणं शक्य आहे, तिथे ते केलं पाहिजे, जमीन सरकारची असेल तर तिथे लोकांना काही कामं सोपवली पाहिजेत, ज्यायोगे जमिनीचा वापरही होईल, काही उत्पादन, नफा मिळेल आणि गरजूंना रोजगारही मिळेल.

शहरात जर एखादा प्लॉट रिकामा असेल तर किमान त्याच्या कम्पाउंड

वॉललगत चार झाडं तरी लावली पाहिजेत. अशा प्लॉटचा वापर गाड्यांच्या पार्किंगसाठीही करता येणं शक्य आहे. शहरात रस्त्यांवर गाड्या ठेवण्यासाठी जागा उरलेल्या नाहीत. रस्त्यात वाहनं उभी केली, तर रस्ता अरुंद होतो त्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावतो, कोंडी होते त्यातून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होतं, इंधनाची नासाडी होते. अशा स्थितीत मोकळ्या जागांचा पार्किंगसाठी वापर केला गेला तर या समस्येवर उत्तर मिळेल. तसंच त्यापासून उत्पन्नही मिळेल. अशा मोकळ्या प्लॉटवर तात्पुरत्या निवासाची सोय केल्याने गरजूंची गरज भागू शकते. अशा मोकळ्या प्लॉटवर फळभाज्या, पालेभाज्या घेण्याचा विचारही करता येऊ शकतो, यामुळे जागेचा योग्य वापर होऊन चांगलं उत्पन्न मिळू शकतं. अशाप्रकारे मोकळ्या जमिनींचा उपभोग पर्यावरणाच्या रक्षणासाठी, अन्नधान्य निर्मितीसाठी किंवा तुम्हाला दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी करता येऊ शकतो, आणि तो तसा केला पाहिजे.

जमीन शेतीसाठी असो किंवा इतर उपयोगासाठी तिचा उपयोग पद्धतशीरपणे केला गेला पाहिजे. उदाहरणार्थ, शेतीमध्ये उत्पादन घेताना हवामान, मातीची प्रत, जमिनीत उपलब्ध असलेले नैसर्गिक घटक, पाण्याची उपलब्धता या गोष्टींचा विचार करून पिकांची निवड केली पाहिजे. ज्या भागात जे पिकं घेणं शक्य आहे, तेच घेतलं पाहिजे. ज्या पिकाला ज्य भागात हवामान, माती, पाण्याची उपलब्धता अनुकूल नाही, तिथे ते घेण्याच्या प्रयत्न केला तर आर्थिक नुकसान तर होतेच, शिवाय जमिनीचंही नुकसान होतं. त्याचप्रमाणे रानोमाळात एखादा बांधकाम प्रकल्प केला तर तिथे राहणाऱ्या लोकांसाठी पाणी पोहचवणं, तिथे निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या विल्हेवाटीची व्यवस्था करणं, वाहतुकीची सोय करणं आणि या साऱ्या सुविधांची देखभाल दुरुस्ती यावर खूप वेळ, पैसा आणि शक्ती नाहक खर्च होते. त्यामुळे अशा पद्धतीने जमिनीचा उपयोग करणं थांबलं पाहिजे.

ज्यांची घरं बंगलेवजा आहेत त्यांनी आपल्या घरांच्या आसपास, अंगणात, टेरेसवर काही अशा प्रकारची झाडं लावली पाहिजेत, कुंड्या ठेवल्या पाहिजेत ज्या-योगे हवा प्रदूषणमुक्त होईल. काही फुलझाडं लावली पाहिजेत, काही झाडं लावली पाहिजेत, व जिथे जिथे जागा आहे तिथे सूर्यऊर्जा, पवनऊर्जा आदी उर्जेच्या नैसर्गिक स्रोतांचा वापर केला पाहिजे. अगदी गरिबाची एखादी झोपडी असेल तर त्यानेही आपल्या झोपडीच्या मागे दोडक्याचा, कारल्याचा किंवा घोसावळ्याचा वेल लावला

पाहिजे, एखादं रोपटं लावलं पाहिजे, ज्यामुळे झोपडीतील सांडपण्याचा, अगदी चूळ भरली तरी त्या पाण्याचा उपयोग होऊ शकेल. अशा प्रकारचं वातावरण, अशा प्रकारचा विचार बिंबवला गेली पाहिजे. निवारा कशाही प्रकारचा असो त्याचा त्यामध्ये राहणाऱ्या व्यक्तीला, आसपासच्या समाजाला, निसर्गाला, पर्यावरणाला लाभ झाला पाहिजे. बंगला असो की झोपडी अवतीभोवती झाडं लावल्याने शुद्ध हवा तसंच ताज्या फळा-फुलांचा लाभ मिळू शकेल आणि हे शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात शक्य आहे.

शेतजमिनीच्या सुयोग्य वापराबद्दल आधी विचार मांडला आहे. माझ्या मते, शेती पट्टेवार व्हायला पाहिजे. उदाहरणार्थ, एका मोठ्या पट्ट्यामध्ये गहू केला पाहिजे. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरीत्या हे करणं शक्य आहे. एकेकटा शेतकरी एककटी पिकं घेतो, प्रत्येकाची क्षमता कमी-जास्त असते. त्यामुळे एकेकट्याला अपेक्षित लाभ मिळत नाही. याउलट, शेतकरी सामूहिकरीत्या एकत्र आले तर ते पिकांचं व्यवस्थित नियोजन करू शकतील. शेतीची सर्व कामं आपल्यात वाटून घेऊन करू शकतील. आणि त्याचा समान फायदा सर्वांना मिळू शकेल. जमिनीचा योग्य वापर होऊ शकेल. रस्त्याच्या कडेला ढाबे असतात. छोटी-मोठी हॉटेल्स् असतात. त्यांच्यावर काही जबाबदाऱ्या टाकणं शक्य आहे. उदाहरणार्थ, रस्त्याच्या दोन्ही बाजूचा काही भाग एकेका ढाब्यावर सोपवून त्या भागात झाडं लावणं, त्यांना पाणी घालणं, वाढवणं हे त्यांच्याकडून करून घेतलं पाहिजे. याचा फायदा त्यांनाच मिळेल. रस्त्याच्या दुतर्फा झाडं वाढतील, त्यांची सावली पसरेल, झाडांना फुलं येतील, झाडांमुळे पक्षी येतील, त्यांची किलबिल ऐकू येईल, वाऱ्याच्या झुळकी वाहतील अशा निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी प्रवासी ढाब्याजवळ थांबतील, थोडी विश्रांती घेतील. ढाब्याच्या उत्पन्नात वाढ होईल. निसर्गाला, समाजाला, देशाला आपण काही देणे लागतो ही भावना सतत आपल्या कृतीमधून प्रकट व्हायला पाहिजे.

निवाऱ्याच्या बाबतीतही हीच गोष्ट आहे. एकदा आपला निवारा केला की हे निवारासुद्धा कसा मनमोकळा राहील आणि सर्व सुविधा कशा सार्वजनिक राहतील याचा विचार आपण केला पाहिजे. आपल्या निवाऱ्याच्या ठिकाणी आपल्याला आनंद मिळाला पाहिजे, समाधान मिळालं पाहिजे. आज आपण पाहतो. प्रत्येकाच्या घरात टी.व्ही. आहे, फ्रीज आहे, वॉशिंग मशिन आहे. याची खरंच गरज आहे का? या गोष्टी कॉमन का असू नयेत? दहा-वीस-पन्नास लोकं एकत्र येऊन या साऱ्याची कॉमन

व्यवस्था करू शकणार नाहीत का ? साधं वर्तमानपत्राचं आपण उदाहरण घेऊ. समजा १०० घरांची एक वसाहत आहे तर तिथे प्रत्येक घरात स्वतंत्र वर्तमानपत्र येतं. म्हणजे १०० घरांत १०० वर्तमानपत्रं येतात. त्यापेक्षा सर्वांनी मिळून दररोज १० वर्तमानपत्रं विकत घेतली आणि वसाहतीत वाचनालयाची व्यवस्था केली तर त्याचा सर्वांनाच लाभ मिळू शकतो. आपल्या घरात येणारे एक वर्तमानपत्र वाचण्यापेक्षा प्रत्येकाला दहा वेगवेगळी वर्तमानपत्रं वाचता येतील. शिवाय दरमहा साठलेल्या वर्तमानपत्रांच्या रद्दीचं उत्पन्न वसाहतीला मिळेल. हीच गोष्ट टी.व्ही.ची. वसाहतीमध्ये सामूहिकरीत्या टी.व्ही. पाहण्याची सोय करता येऊ शकते. या साऱ्यातून विजेची, पैशांची किती बचत होऊ शकते याचा विचार करा. याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे अशा सामूहिक व्यवस्थांमुळे लोक एकत्र येऊ लागतील, त्यांच्या ओळखी होतील, भेटीगाठी वाढतील, अडीअडचणी, दु:ख, संकटं लोक एकमेकांना शेअर करतील व एकमेकांना मदत करतील. आज आर्थिक स्वातंत्र्याच्या नावाखाली माणूस समाजशील न राहता तो एकांडा होत चालला आहे. अगदी घरातसुद्धा नवरा-बायकोमध्ये भांडणं होतात व प्रकरणं घटस्फोटांपर्यंत जातात. याचं कारण म्हणजे एकमेकांना समजून घेण्याचा अभाव. मिळून-मिसळून काही करावं ही भावना हरवत चालली आहे. आज सोसायट्यांमध्ये टेरेसची सुद्धा वाटणी झालेली दिसते. खरंतर टेरेस सर्वांसाठी कॉमन हवं. ते सर्वांनी मिळून एकोप्याने वापरायला हवं पण सामूहिक आनंदाची जाणीव आता लोप पावत आहे. शेजार-पाजार, जिव्हाळा, प्रेम या गोष्टी आता हरवत चालल्या आहेत. या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. माणसाच्या जीवनात त्यांना काही एक स्थान आहे. त्या अशा हरवू नयेत, म्हणूनच माणसांची वाटचाल पुन्हा व्यक्तीपासून समूहाकडे झाली पाहिजे. त्यात आर्थिक फायदे आहेतच, शिवाय सामाजिक व सांस्कृतिक फायदेसुद्धा आहेत म्हणूनच समाजाला एकत्र आणण्याची प्रक्रिया घडण्याची गरज आहे.

वस्त्र ही माणसाची मूलभूत गरज आहेच पण आज ती मोठ्या प्रमाणात फॅशनमध्ये परिवर्तित झालेली दिसत आहे. लज्जारक्षण हाच वस्त्रांचा केवळ उद्देश राहिला नाही, तर व्यक्तिमत्त्व उठावदार दिसावं हा उद्देश कपड्यांना चिकटलेला दिसतो. साहजिकच कपड्यांच्या बाबतीत भपकेबाज दिखाऊपणाला महत्त्व आलं आहे. माणसाचं व्यक्तिमत्त्व महत्त्वाचं आहेच, पण ते केवळ कपड्यांमुळे खुलतं, हा गैरसमज आहे आणि तो योग्य नाही. तुमच्या अंगच्या गुणांमुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव येतो, कपड्यांमुळे नव्हे, तरीदेखील आजकाल लोकांमध्ये विशेषत: तरुणांमध्ये

कपड्यांची मोठी क्रेझ निर्माण झालेली दिसते. मुला-मुलींची कपाटं विविध प्रकारच्या कपड्यांनी ठासून भरलेली असतात, तरीही आणखी नवे कपडे त्यांना हवे असतात. तुमच्या कपाटात शंभर शर्ट आहेत पण आता अमुक फॅशन राहिली नाही, तमुक रंग मला आवडत नाही, ते डिझाईन आता जुनं झालं, पुन्हा पुन्हा तेच तेच कपडे घालणं बोअर होतं, मित्राच्या पार्टीला जाण्यासाठी नवा शर्ट हवा अशा कोणत्याही कारणाने किंवा असं कोणतंही कारण नसताना तुम्ही १०१ वा शर्ट बाजारात जाऊन खरेदी करता. नव्याचे नऊ दिवस याप्रमाणे लगेचच हा शर्ट जुना होऊन १०२वा शर्ट तुमच्या कपाटात येतो. आजकाल एक-दोन महिन्यात फॅशन बदलते, नवं डिझाईन जुनं होऊन जातं आणि बरेचसे कपडे फारसे वापरले न जाताच कपाटात ढीग बनून राहतात, हा वस्त्राचा अपव्यय नाही का? महागड्या किंमतीचे कपडे खरेदी करून आपण पैशांचा अपव्यय करत नाही का? कापड उद्योगाला त्यामुळे फायदा मिळेल पण तुमच्या खिशाला लागलेल्या गळतीचं काय? मला आठवतं, आम्ही कॉलेजमध्ये जात असू तेव्हा आम्ही मित्र-मित्र एकमेकांचे कपडे वापरत असू. माझ्या मित्राचा शर्ट मी वापरायचो, माझा शर्ट तो वापरायचा त्यामुळे वेगवेगळ्या व्हरायटीचे शर्ट आम्हाला वापरायला मिळायचे. प्रत्येक व्हरायटीचा किंवा फॅशनचा शर्ट स्वत: विकत घेऊन कपाटात साठवून ठेवायची गरज आम्हाला वाटत नसे. शास्त्रीयदृष्टीने एकमेकांचे कपडे वापरू नयेत, हा भाग वेगळा पण कपड्यांमध्येही शेअरिंग होऊ शकतं. मित्रत्वाची, आपलेपणची भावना वाढीस लागण्यासाठी हे महत्त्वाचं आहे. त्याकाळी आम्ही बाद कपड्याचा वाकळा तयार करायचो त्याचा वापर इतका सुंदर असायचा की कडाक्याच्या थंडीतसुद्धा उबदार वाटायचं. त्या काळात इतर अनेक गोष्टींच्या कमतरेबरोबरच कपड्यांचीही कमतरता होती. आज कापड विपुल प्रमाणात उपलब्ध आहे, अनेकांची कपाटं कपड्यांनी खच्चून भरलेली आहेत, पण त्याचबरोबर अंगावरच्या एका वस्त्रानिशी राहणाऱ्यांची संख्याही कमी नाही, कपड्यांअभावी रस्त्यावर उघडीनागडी फिरणारी आणि भीक मागणारी लहान मुलं आजही दिसतात. ही विषमता दूर झाली पाहिजे.

अन्नाचं सुद्धा असंच आहे. चार-पाच दशकांपूर्वी आपल्या देशात अन्नधान्याचा तुटवडा होता. वाढत्या लोकसंख्येची गरज भागेल इतकं अन्नधान्य देशात पिकत नव्हतं. त्यामुळे परदेशातून अन्नधान्य मिळवावं लागत होतं. वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी अन्नधान्याची परिस्थिती खूप बिकट होती. मात्र हरित क्रांतीनंतर

चित्र बदललं. आज आपल्याकडे विक्रमी अन्नधान्य उत्पादन होत आहे. पूर्वी गोदामांमध्ये अन्नधान्याचा तुटवडा असायचा, अता गोदामात अन्नधान्य सडून चाललेलं आहे. ही दोन्ही चित्रं वाईटच आहेत. एकवेळचं पोटभर जेवण नशिबी नाही अशी कोट्यवधी कुटुंब आजही आहेत, त्यांच्यापर्यंत अन्नधान्य न पोहचता ते गोदामात सडून जात आहे हे खूप विदारक चित्र आहे. आज आपण पाहतो, लग्न समारंभात किंवा कोणत्याही कार्यक्रमात जेवणावळी चालतात. लोक ताटात भरभरून वाढून घेतात, अन्नपदार्थ पाहून भरपूर खाण्याची इच्छा लोकांना होते पण जेवताना प्रत्येक घासागणिक भूक कमी होत जाते आणि मग जाणवतं की ताटात वाढून घेतलेलं सगळं आपण संपवू शकत नाही. शेवटी अर्ध्याहून अधिक अन्न वाया जातं. अन्न वाया जऊ न देणं ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. पूर्वीच्या काळी दारात भिक्षेकरी येत असत. घराघरात शिल्लक राहिलेलं अन्न त्यांच्या पदरात पडत असे, आजही अर्धपोटी लोक खूप आहेत पण फ्लॅट संस्कृतीत भिक्षेकरी येईनासे झाले आहेत. त्यामुळे अन्न अक्षरश: कचऱ्यात जातं. त्यातसुद्धा, ओला कचरा, सुका कचरा वेगळा वेगळा केला पाहिजे, तेही आपण करत नाही. त्यामुळे वाया जाणाऱ्या अन्नाचा उपयोग कोणासही होत नाही. वास्तविक या अन्नाचा उपयोग उपाशीपोटी राहणाऱ्या लोकांसाठी व्हायला हवा. भुकेलेल्या जनावरांसाठी व्हायला हवा. शहरात अशा काही संस्था असतात त्या शिळं उरलेलं चांगलं अन्न लोकांकडून गोळा करतात व ज्यांना पोटभर मिळत नाही अशा गरजूंना त्यांचं वाटप करतात. आपल्याकडचं उरलेलं अन्न त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचं काम आपण केलं पाहिजे. शिळ्यापाक्या अन्नाचा उपयोग पशुखाद्यात होऊ शकतो. तसंच खतांच्या निर्मितीसाठी होऊ शकतो. अशा प्रकारची माहिती घेऊन त्यांच्यापर्यंत अन्न पोहचवण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. आपला मानवतावादी दृष्टिकोन आपण नेहमी जागा ठेवला पाहिजे.

अन्न, वस्त्र, निवारा यांचा योग्य पद्धतीने वापर करून आपणाला जमिनीवर येणारा अनावश्यक ताण कमी करता येईल. अन्न शास्त्रीय दृष्टीने खावे, ते वेळेवर व काळ वेळेनुसार खावे भुकेनुसार खावे परंतु पोट तडीस जाईल इतपत नको. वस्त्र शास्त्रीयदृष्टीने वापरावे ते काळ-वेळेनुसार परिधान करावे. त्याचा साठा अनावश्यक करू नये. निवारा गरजेप्रमाणे असावा अनावश्यक गोष्टी टाळता आल्या तर अधिक लोकांची गरज भागेल असे भान सर्वांनी ठेवावे. उदा. घरात माणसे दोन व चार शौचालय-बाथरूम. सर्वांनी एकत्र राहण्यात मजा आहे का? लहान मुलांना कीड्स

रूम व आपल्याला मास्टर बेडरूम हे सर्व पुन्हा एकदा मानसिक, शास्त्रीय दृष्टिकोनातून तपासून घेणेची गरज आहे. जमिनीचा उपयोग हा प्लॅनिंगने केला पाहिजे. अनावश्यक जमिनी तसेच पडीक जमिनी सरकारने उपजाऊ किंवा उपयोगात कशी आणावी यासंबंधी अभ्यास करून कठोर पारदर्शक व असंख्य जनतेच्या भल्यासाठी कायदे करावेत.

थोडक्यात, आपण पाहिलं की अन्न, वस्त्र, निवारा, जमीन या मूलभूत गोष्टी आहेत. ती नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. पण आपण ज्या पद्धतीने तिचा उपभोग घेतो त्यातून या संपत्तीचा बऱ्याच प्रमाणात दुरुपयोग होतो, ही संपत्ती बऱ्याच प्रमाणात वाया जाते. तिचा आपण ऱ्हास करतो, हे आपण टाळलं पाहिजे. या नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग मानवी विकासासाठी पर्यावरणाच्या समतोलासाठी तसंच जीवसृष्टीच्या संवर्धनासाठी झाला पाहिजे. त्यासाठी या साऱ्यांच्या वापराचं नियोजन करणं अत्यावश्यक आहे.